# पुणे-रत्नागिरी सायक्लोथॉनला प्रारंभ

## दि.१२. डिसेंबरपर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबविणार

**पुणे, दि. ७ (प्रतिनिधी)** - मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ), फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड, अशोक लेलँड आणि बायसिकल एंजल्सच्या सहकार्याने दुसऱ्या सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या मंगळवार दि. ८ ते १२ डिसेंबर या कालावधीत पुणे ते रत्नागिरी अशी सायक्लोथॉन होणार आहे. यामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यावेळी गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठी सायकलचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच शिरवळ, उंब्रज, कोकरूड आणि पाली येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. वैद्यकीय शिबिरांसाठी २० हून अधिक डॉक्टरांचे पथक सामील होणार असून, त्यामध्ये केईएम रुग्णालयातील पेडियाट्रीक विभाग, भारती हॉस्पिटलच्या ऑडियोलॉजी, स्पीच व डेंटल विभागाचे पथक, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलमधील डॉक्टर सहभागी होणार आहेत. मुकुल माधव फाउंडेशनच्या नियंत्रणाखाली असलेल्या ३ हजार १७१ मुलांची तपासणी यावेळी करण्यात येणार आहे.

एमएमएफच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी बायसिकल एंजल्सचे संस्थापक, चित्रपट निर्माते राकेश बक्षी आणि इंग्लंड येथील कान, नाक, घसा तज्ज्ञ राम धिल्लाँ उपस्थित होते.

यावेळी छाब्रिया म्हणाल्या, सायक्लोथॉनदरम्यान सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त मुलांबाबत कळले. या आजाराची अनेक मुले विकलांगतेमुळे शाळांपासून दूर राहतात. अशा विशेष मुलांना वर्गात बसण्यासाठी विशेष खुर्च्या लागतात. ही गरज पूर्ण करण्यासाठी एमएमएफला मदत करण्याचे आवाहन सातारा जिल्हा परिषदेने केले होते. त्यानुसार एमएमएफच्या वतीने फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने विशेष खुर्च्या देण्यात येणार आहेत. ज्याचा लाभ १०० विद्यार्थ्यांना होणार आहे.